# <u>परिपत्रक</u>

ओ एन जी सी (डब्ल्यू ओ यू) कर्मचारी संघटनेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, **पेट्रोलियम अँड गॅस वर्कर्स फेडरेशन ऑफ इंडिया (PGWFI)** तर्फे दर तीन वर्षांनी आयोजित करण्यात येणारी त्रैवार्षिक परिषद यावर्षी मुंबई येथे आयोजित करण्यात येत आहे. यापूर्वी सन २००५ मध्ये या परिषदेचे आयोजन मुंबई येथे करण्यात आले होते. त्या वेळी **विविध देशांमधून (इजिप्त, फ्रान्स, व्हेनेझुएला, सौदी अरेबिया इ.)** प्रतिनिधी उपस्थित राहिले होते.

सुमारे २० वर्षांनंतर पुन्हा एकदा हा मान मुंबईला प्राप्त झाला असून, मुंबईतील सर्व ऑइल सेक्टर कंपन्यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद **दिनांक ०९ व १० मे २०२६** रोजी मुंबई येथे आयोजित करण्यात येत आहे. यावेळी सुद्धा **ब्राझील, बांग्लादेश, नेपाळ, सायप्रस** येथील प्रतिनिधी परिषदेत उपस्थित राहणार आहेत.

या परिषदेसाठी एकूण अंदाजित खर्च सुमारे **रु. २५,००,०००/- (रुपये पंचवीस लाख फक्त)** असून त्यामध्ये हॉटेल व्यवस्था, दोन दिवसांचे भोजन व नाश्ता, जाहिरात, वाहतूक व इतर आवश्यक खर्चाचा समावेश आहे.

ONGC कर्मचारी संघटना ही PGWFI सोबत संलग्न युनियन असल्याने, सदर परिषदेच्या आयोजनासाठी ONGC मधील कर्मचारी संघटनेच्या प्रत्येक **सभासदाकडून रु. १५००/- (रुपये पंधराशे फक्त)** इतके योगदान (Contribution) घेण्याचे ठरविण्यात आले आहे. तसेच **कंत्राटी कामगारांकडून रु. ३००/-** इतके योगदान घेण्यात येणार आहे. याबाबतचा ठराव **दि. १७/०३/२०२६** रोजी आयोजित व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे मंजूर करण्यात आला आहे. ज्या सभासदांना या योगदानाबाबत काही हरकत असल्यास त्यांनी कळवावे. अशा सभासदांना भरलेली रक्कम परत करण्यात येईल.

या परिषदेमध्ये **तेल व नैसर्गिक वायू क्षेत्रातील सध्याच्या घडामोडी, उद्योगातील बदल, नवीन कामगार कायदे तसेच विविध कंपन्यांतील प्रलंबित व ज्वलंत प्रश्नांवर सखोल चर्चा होणार आहे**. विशेषतः **कंत्राटी कामगारांच्या समस्यांवर देखील स्वतंत्रपणे विचारमंथन करण्यात येणार आहे.**

या परिषदेस उपस्थित राहण्यास इच्छुक सभासदांनी आपली नावे श्री. नवनाथ टेमकर, उपाध्यक्ष, ओएनजीसी (डब्ल्यू ओ यू) कर्मचारी संघटना यांच्याकडे नोंदवावीत.

धन्यवाद.

आपला नम्र,

**(प्रदीप मयेकर)**

**अध्यक्ष**

**पेट्रोलियम अँड गॅस वर्कर्स फेडरेशन ऑफ इंडिया**